**"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात वार्ड स्तरीय समिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग.**

**शासन निर्णय क्रमांक- मबावि २०२४/प्र.क्र.१५६/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,

हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक:-०५ जुलै, २०२४.

**संदर्भ:-** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.२८.०६.२०२४ व दि.०३.०७.२०२४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना राबविण्यात संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. दि.२८.०६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागरी भागात वार्ड अधिकारी यांच्यास्तरावर लाभार्थी महिलांचे अर्ज स्विकृती/तपासणी/पोर्टलवर अपलोड करण्याची बाब नमूद करण्यात आली आहे. तसेच दि.०३.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये तालुकास्तरावर अशासकीय सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि, “अ+”, “अ” व “ब” वर्ग महानगरपालिकांमध्ये वार्डस्तरीय संरचना असल्याने, या महानगरपालिका क्षेत्राकरीता “तालुकास्तरीय समिती” ऐवजी “वार्ड स्तरीय समिती” गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर अशासकीय सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती शासन निर्णय दि.०३.०७.२०२४ अन्वये गठीत करण्यात आली आहे. तथापि, “अ+”, “अ” व “ब” वर्ग महानगरपालिकांमध्ये वार्डस्तरीय

संरचना असल्याने, या महानगरपालिका क्षेत्राकरीता "तालुकास्तरीय समिती" ऐवजी "वार्ड स्तरीय समिती" गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची संरचना खालीलप्रमाणे राहील:-

<u>वार्ड स्तरीय समिती:-</u>

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | अशासकीय सदस्य | अध्यक्ष |
| २ | समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| ३ | बाल विकास प्रकल्प अधिकारी (शहर) (ज्येष्ठतम) | सदस्य |
| ५ | एक अंगणवाडी पर्यवेक्षिका (बा.वि.प्र. यांच्या मान्यतेने) | सदस्य |
| ६ | संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) | सदस्य |
| ७ | दोन अशासकीय सदस्य | सदस्य |
| ८ | संबंधित वार्ड अधिकारी | सदस्य सचिव |

सदर समितीमध्ये ३ अशासकीय सदस्य असतील. त्यामधील एक अध्यक्ष राहतील. सदर समितीच्या अध्यक्षांची व इतर २ अशासकीय सदस्याची निवड सदर जिल्हयांच्या पालकमंत्री यांच्यामार्फत करण्यात येईल.

सदर समितीची बैठक आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

(१) सदर योजनेची देखरेख व संनियंत्रण करणे.

(२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत नियमित आढावा घेणे.

(३) सदर योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेणे.

(४) ग्रामीण स्तरावर प्राप्त झालेल्या अर्ज, त्यांची छाननी/तपासणी करणे, सदर अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करणे.

२. वार्ड स्तरीय समितीने त्यांच्याकडील प्राप्त अर्जाची छाननी करुन तात्पुरती यादी प्रसिध्द करावी. तसेच त्यावर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप यांचे निराकरण करुन तात्पुरती सुधारित पात्र/अपात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम मान्यतेसाठी मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावी.

३. शासन निर्णय दि.२८.०६.२०२४ मधील तरतूदी तसेच त्यानुषंगाने दि.०३.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित केलेल्या इतर तरतूदी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७०५१२०४५५११३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUP KUMAR YADAV

Digitally signed by ANUP KUMAR YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=5f3908d24b2568f3b31ae7a2607b77e47b9cced8530762f703728fbf48d2b4f9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=04D0A29A400CB59ACDA95D417719F74B7810596B06FB1A4D38C8EA417B170BB0, cn=ANUP KUMAR YADAV
Date: 2024.07.05 12:39:27 +05'30'

**(डॉ.अनुपकुमार यादव)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.विभागीय आयुक्त (सर्व),
१२.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१३.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१४.जिल्हाधिकारी (सर्व),
१५.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१६.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९.सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०.सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
२१.सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२२.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
२३.निवड नस्ती, कार्यासन-२